
ISSN-2277-4491

# VIBGYOR

Bi-annual Multi Disciplinary Research Journal
Special Issue : April 2018





# VIBGYOR

Bi-annual Multidisciplinary Research Journal

**SPECIAL ISSUE - APRIL 2018**


*The VIBGYOR, a plethora of gem studded writings by eminent scholars from across the globe would genuinely usher a new vigour among the intellectuals in the world. The National and International luminaries in the Editorial Board would synchronize the views penned by renowned scholars from far and wide for publication. The biannual Multi-disciplinary Research Journal extends its canvas to all qualitative writings.*


Editor In Chief

**DR. JOBI GEORGE**

Principal

Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur

Editor

**DR. SUNIL SHINDE**

Associate. Prof. & Head

Dept. of Economics

Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur



Published By

**Research Journal Publication Committee**

Bhiwapur Mahavidyala, Bhiwapur

Accredited with Grade B (CGPA-2.54) by NAAC, Bengaluru

Dist. Nagpur - 441201(M.S.) India

Ph. : No. 07106-232349, 9423602502, 9422829240

E-mail : vibgyorbmv@yahoo.in

Website : www.bgm.ac.in

- **VIBGYOR**

  Bi-annual Multidisciplinary Research Journal
  Special Issue - April 2018

- Published By
  **Research Journal Publication Committee**
  Bhiwapur Mahavidyala, Bhiwapur
  Dist. Nagpur - 441201(M.S.) India
  Ph. : No. 07106-232349, 9423602502, 9422829240
  E-mail : vibgyorbmv@yahoo.in
  Website : www.bgm.ac.in

- **UGC Approved List of Journals**
  **Journal No. 46447**

- **ISSN-2277-4491**

- **Special Issue : April 2018**


- **© Author**
  Copyright © All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrival system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocopying, recording or otherwise without prior permission of the Editor.

  The papers included in this publication have been directly reproduced, with minimum editorial intervention, from the files sent by the respective authors. Opinions expressed in the research papers are those of contributors and do not necessarily match the views of Research Journal Committee of the college. The Publisher or Editorial Board is not responsible for any information contained therein.


- **Type Setting**
  **Scan Dot Computer,**
  Mahal, Nagpur Mobile : 9822565782
  E-Mail : aakar100@gmail.com

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | THE STATUS OF ENGLISH AS A LINK LANGUAGE IN INDIA TODAY: A REVIEW | **Dr. Jobi George** | 7 |
| 2. | Identity and Multiculturalism in Zadie Smith's, 'White Teeth' | **Dr. Vinita S Virgandham** | 12 |
| 3. | Identity, Displacement, and Resilience: Amitav Ghoshs Portrayal of the Colonial Experience | **Dr. Raheel Quraishi** | 18 |
| 4. | A study on Patent awareness among faculties of Engineering Colleges | **Rajasree O.P., Mangala A. Hirwade, Sunilkumar U.T.** | 22 |
| 5. | An Overview of Indian Government Policies in the Agricultural Sector and Farmers' Suicides | **Dr. Mangesh Kadu** | 29 |
| 6. | Physical Fitness: The need of the Era | **Asst. Prof. Aditya Sarwe** | 35 |
| ७. | द्रारिद्र्य निमुर्लन आणि सरकारच्या कल्याणकारी योजना : एक दृष्टीक्षेप | **प्रा. डॉ. सुनिल शिंदे** | ३७ |
| ८. | महाराष्ट्रातील तमाशा : एक लोकनाट्य | **प्रा. डॉ. मधुकर वि. नंदनवार** | ४१ |
| ९. | मानवाधिकार और बुद्ध तत्वज्ञान | **प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण** | ४६ |
| १०. | नागपुर शहरातील औद्योगिक विकासासाठी कामगारांचे अध्ययन : एक अभ्यास | **प्रा. डॉ. राजेश बहुरुपी** | ५० |
| ११. | आधुनिक काळात मूल्यशिक्षण व्यवसायाची खरी गरज | **प्रा. डॉ. अनिता महावादीवार** | ५३ |
| १२. | धम्मपालनाची मानवी दृष्टिकोनातून वर्तमान उपयोगिता | **सहा. प्रा. सोमेश्वर विनोदराव वासेकर, सहा. प्रा. भिमादेवी महादेव डांगे** | ५७ |

# महाराष्ट्रातील तमाशा : एक लोकनाट्य

❑ डॉ. मधुकर वि. नंदनवार
मराठी विभाग प्रमुख,
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

**सारांश :**

भारत हा विविध सांस्कृतिक परंपरांनी नटलेला देश आहे. हस्तकला, संगीतकला, शिल्पकला, चित्रकला, नृत्यकला, वाड्.मयकला, लोककला इ. कलांना जोपासणारा भारत देश सांस्कृतिक क्षेत्रात सर्वोच्च स्थानी आहे. प्राचीन काळापासुन भारतातील खेडयापाडयांत अनेक लोककला अस्तित्वात आल्या. मानवाने आपल्या प्राथमिक गरजांच्या पूर्तिनंतर मनोरंजनाची गरज भागविण्यासाठी गायन-नृत्य-अभिनयाची परंपरा सुरू केली. यातून भारतातील विविध प्रातांत विविध लोककला निर्माण झाल्या. याला महाराष्ट्र अपवाद कसा राहणार. ही भूमी तर लोककलांची समृध्द खाण आहे.

महाराष्ट्र जशी संतांची व लोककलावंतांची भूमी म्हणून ओळखल्या जाते, तशी ती लोककलांची भूमी म्हणूनही सर्वपरिचित आहे. जीवनाचा मनमुराद आनंद लुटणे हा महाराष्ट्राचा स्थायिभाव आहे. म्हणुनच विविध लोककलावंताची महाराष्ट्राला लोककलेची वैशिष्टयपूर्ण संस्कृती बहाल केली. आज नंदीवाला, गोसावी, भाट, गारुडी, बहुरूपी, गोपाळ, मदारी, वासुदेव, पांगुळ, जोशी आदी लोकसंस्कृतीचे उपासक महाराष्ट्रात कुठे ना कुठे भेटतात. या लोककलावंतांबरोबरच महाराष्ट्रात विविध लोकनाटयांचे दर्शनही आपल्याला होते. कोकनात नमन आणि दशावतार, कर्नाटक व महाराष्ट्राच्या सीमेवर आटा किंवा यक्षगान (पूर्वीचा रामावतार) विदर्भात दंडार, मराठवाडयात खडी गंमत या लोकनाटयांबरोबर ललित, गोधळ, कीर्तन, भारूड, सुंबरान, डहाका, बोहाळा, गंगासागर, खंडोबाचे जलसे, आंबेडकरी जलसे, जसे अनेक लोकनाटये महाराष्ट्रात पाहावयास मिळतात. या सर्व लोकनाटयांमध्ये तमाम महराष्ट्राला सुपरिचित असलेले सर्वात लोकप्रिय लोकनाटय म्हणजे 'तमाशा' होय.

कर्नाटकात यक्षगान, केरळात कथकली ह्या लोककला प्रसिद्ध आहेत, तर महाराष्ट्रात तमाशा हे लोकनाटय प्रसिद्ध आहे. तमाशा हा परंपरेने चालत आलेला लोककलाप्रकार आहे. लोकजीवनाची जडणघडण होत असताना ज्या-ज्या बाबी जीवनात निर्माण होतात, त्या सर्व प्रतिबिंब आपणास तमाशातून पाहावयास मिळते. लोकभाषेतून लोकजीवनाचा झालेला अविष्कार लोकांना आपल्याकडे खेचून घेतो. म्हणूनच खेड्यापाड्यांत व शहरात आजही तमाशाला फार महत्व आहे.

**'तमाशा' या शब्दाचा अर्थ :**

'तमाशा' शब्द अनेक अर्थाने वापरतात. जसे, आपल्या संसारातील भांडण लोकांना दाखवून स्वतःचा हशा करवून घेणे, याला 'तमाशा दाखवणे' असा शब्दप्रयोग आपल्या भाषेत होताना दिसतो. लोकांपुढे आपल्या मूर्खपनाचे प्रदर्शन मांडणे म्हणजे 'तमाशा' असाही एक अर्थ निघतो. तमाशा म्हणजे भांडण, तमाशा म्हणजे खेळ असेही अर्थ रूढ आहेत. भांडण-खेळामध्ये बघ्यांची गर्दी जमते आाणि लोक आनंद लुटतात.

'तमाशा' करू नको', 'नाटक करू नको' असे वाक्प्रयोग लोक करताना आढळतात. यावरून तमाशा म्हणजे 'नाटक' असाही एक अर्थ निघतो. बरेचदा तमाशा शब्द 'ढोंग', 'गंमत' या अर्थानेही वापरल्या जातो. 'तमाशा' हा स्वतंत्र शब्द आहे. तम+आशा असा सामायिक विग्रह करून त्याचा अर्थ स्पष्ट होऊ शकत नाही. 'तमाशा म्हणजे देखावा की, ज्यात नाच्या पोऱ्या स्त्रीचे सोंग घेवून लावण्या म्हणत खेडेगावातील लोकांची करमणूक करतो असा देखावा, असा अर्थ झाला आहे. तमाशा शब्दात मूळ अर्थ तमासगीर या शब्दात उतरला आहे. भारतीय सांस्कृतिकोशात तमाशा शब्द 'अरबी' असुन त्याचा अर्थ 'प्रेक्षणिय दृश्य' असा आहे. तमाशा संस्थेच्या शिल्पकारांनी 'शाहीर' ही संज्ञाही मूळ 'शायर' किंवा 'शाहर' या अरबी या शब्दापासुन बनलेली आहे. तमाशा या संस्थेच्या आणि तिच्या शिल्पकाराचे नाव अरबी असल्यामुळे ही संज्ञा मुसलमानांच्या प्रभावातून उदय पावली असावी असाही काही विद्वानांचा कयास आहे.[१] अशा प्रकारे 'तमाशा' आणि 'शाहिर' शब्द एकाच अरबी भाषेतून आल्याचे जाणवते. शाहीरांना मवनी,मुसलमानी भाषेत कवी म्हणतात. 'तमाशा' शब्दासंदर्भात नामदेव व्हटकर यांचे संशोधन यापेक्षा भिन्न आहे. ते म्हणातात, 'तमाशा' हा शब्द मूळ 'पर्शीयन' भाषेतील आहे. तेथुन तो

उर्दूत आला, उर्दूतून मराठी भाषेत येऊन रूढ झाला. 'उर्दूत' आणि 'पार्शियन' या भाषांचा अर्थ मौज, आनंद देणारे किंवा आश्चर्यकारक दृश्य असा आहे.[२]

तमाशा या शब्दाचा गंमत हा पर्यायी शब्द आहे. गमतीतून मानवाला विरंगुळा मिळतो, करमणूक होते, मनोरंजन होते. तमाशा या खेळातूनसुद्धा या बाबींचा प्रत्यय येतो. तमाशाचा अर्थ स्पष्ट करताना असे म्हणता येईल की, अभिनय, गायन, विनोद, पोवाडा, (कथा), लावणी यांतून एकाच वेळी सादर होणारे लोकनाटय म्हणजे तमाशा होय. किंवा लोकजिवनाचे दर्शन, मनोरंजन आणि बोध या तिन्ही घटकांचा एकजिव मेळ करून लोकसमूहासमोर लोकभाषेत सादर केलेले लोकनाट्या म्हणजे 'तमाशा' होय.

**तमाशाचा उगम :**

तमाशाचा उगम नेमका केव्हा झाला हे सांगणे कठिण आहे. मराठी रंगभूमीचा जसा लिखित इतिहास आपल्याकडे आहे, तसा तमाशाचा नाही. तमाशातले नाट्य लिखित नसल्याने ते मौखिक रूपाने लोकभाषेतून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत गेले. साधारणतः शिवकाळापासुन तमाशाचा उगम झाल्याचे समजते. शिवकाळात पोवाडे तर पेशवेकाळात लावणीचा उगम झाला असे मानण्यात येते. ही दोन्ही तमाशाची अंगे आहेत. पण त्यापूर्वीही शाहिरी काव्य उपलब्ध असावे. आज जरी आपल्याला त्यासंदर्भात पुरावे सापडत नसले, तरी प्राचीन वाङ्मयात मराठीच्या खाणाखुणा मात्र आपल्याला दिसुन येतात. 'नागेश संप्रदयाचा शाहीर मन्मथशिवलिंग' यांची इ.स. १६०० पूर्वीची 'कराडच्या भवनावरील लावणी' उपलब्ध आहे. पण या मन्मथशिवलिंगाच्या पूर्वी पोवाडयाची रचना केली जात होती हे चवदाच्या शतकातील 'अज्ञानसिद्ध व बहिरापिसाविरचित दोन पोवाडे' या लेखावरून सिद्ध झालेले आहे.[३] तमाशाच्या उगमासंदर्भात बोलताना डॉ. पुरूषोत्तम कालाभूत सांगतात की, 'पेशवाईत सवाई माधवराव व दुसरा बाजीराव यांच्या कारकिर्दीत तमासगीर शाहीरांना राजाश्रम लाभला त्यामुळे तमाशाचा उत्कर्ष झाला.[४] पेशवाईचा काळ बघता नानासाहेब पेशव्याच्या कारकिर्दीत रामजोशी या विद्वान ब्राम्हण शाहिराने तमासगिरी केली. सवाई माधवरांवाच्या कारकिर्दीत होनाजी बाळा हा प्रसिद्ध शाहिर होऊन गेला. या पेशवाईत परसराम, सगनभाऊ, अनंतफंदी, प्रभाकर आदी शाहीर गाजले. हे सर्व शाहीर इ.स. १६५० ते १८५० या कालखंडात होऊन गेले. हा काळ उत्तर पेशवाईचा काळ होता. १८१८ मध्ये पेशवाईचा बिमोड करून इंगजानी महाराष्ट्रात आपली सत्ता मजबूत केली. यानंतर शाहिरांचा राजाश्रम नष्ट झाला. या सर्व शाहिरांचा कालखंड पाहता १८ व्या शतकाच्या पूर्वाधात पेशवाईत तमाशाचा उगम झाला असे गृहित धरले, तर प्रश्न असा पडतो की, एकदम १८ व्या शतकातच इतके संपन्न वाङ्मय कसे निर्माण झाले. याचाच अर्थ त्यापूर्वी महाराष्ट्रात तमासगिरी असावी, पण त्याचे लिखित पुरावे नाहीत. तमाशा हे परंपरेने चालत आलेले मौखिक लोकनाट्य असल्याने त्याचा उगम फार पूर्वी झाला आणि उत्तर पेशवाईत तो भरभराटीला आला, हे स्पष्टपणे म्हणता येते.

**तमाशाचे स्वरूप :**

तमाशा हा जरी रांगडा लोकनाट्यप्रकार असला तरी त्याचे स्वरूप मात्र बहुआयामी आहे. तमाशाची लिखीत संहिता नसली, तरी तमाशा सादरीकरणाचे अनेक टप्पे आहेत. तमाशा सुरू झाल्यापासुन ते संपेपर्यंत विशिष्ट प्रकारचे तंत्र आपल्याला मंचावर दिसेल. तमाशातील सर्व घटकांची माहीती झाल्याशिवाय तमाशाचे निश्चित स्वरूप कळणार नाही.

**तमाशातील कलावंत**

महाराष्ट्रातील तमाशाचा शाहीर, नाच्या, नाची, मावशी, सोंगाडया (नकल्या), झिलकरी हे कलावंत असतात. या कलावंतांच्या गायन, नृत्य, अभिनय, विनोद, निवेदन इत्यादीतून तमाशा लोकनाट्य सादर होत आहे.

**१. शाहीर :** हा तमाशाचा सूत्रधार असतो. शाहिराच्या नावाचे त्याचा तमाशाचा फड ओळखल्या जातो. परिस्थितीनुसार क्षणात कवण रचण्याची कला त्याला अवगत असते. त्याचा पेहेराव साधा पण निटनेटका असतो. धोतर सदरा घातलेला प्रसंगी बिना अस्तीनचा कोट परिधान केलेला, मानेभोवती दुपट्टा घेतलेला रुबाबदार शरीरयष्टीचा हा शाहीर तमाशाचा नामक शोभुन दिसतो. उंच स्वरात गाणारा हा शाहीर फार अभ्यासक नसला, तरी त्याच्या काळातील गोष्टी, महत्वाच्या घटना, ज्वलंत सामाजिक समस्या, महत्वाचे व्यक्ति - त्यांचे कार्य इत्यादींची माहीती त्याला असते. तो अल्पशिक्षित असला, तरी आपल्या निर्मितीसाठी संतांच्या रचनेचे, पंडिती कवितेचे, तसेच लोकवाङ्मयाचे त्याला ज्ञान असते. पहाडी आवाज हा त्याचा विशेष असतो.

**२. नाच्या :** हा तमाशातील दुसरा महत्वाचा कलावंत. आकर्षक बांधा असलेला, नृत्यकला अवगत असलेला उमदा तरुण मुलगा तमाशात नाच्याची भूमिका बजावतो. नऊवारी लुगडे परिधान केलेला, अंगात तंग चोळी घतलेला, कमरेला

आकर्षण कमरपट्टा बांधलेला हातात बांगड्या आणि बाजुबंद घातलेला, पायांत पैजनांची मोठी चाळ बांधलेला हा तरूण पोऱ्या, नाच्या नटूनथटून रंगमंचावर येतो व आपल्या तरुणसुलभ हावभावंनी प्रेक्षकांना घायाळ करतो. नाच्या हे तमाशातील सर्वात आकर्षत पात्र. तमाशात नाच्याला लावणीत नृत्यांगणा, गवळीत राधा, वगात नायिका, तर कधी नायकाची, शाहिराची कारभारीण अशा विविध भूमिका पार पाडाव्या लागतात.

**३. नाची :** ही तमाशातील स्त्री नायिका. पश्चिम महाराष्ट्रात काही ठिकाणी स्त्री नाचीच्या रुपात दिसते. पेशवाईत लावणीत स्त्रीया नाचत, पण तमाशांमध्ये भाग घेत नसत. पेशवाईनंतर इंग्रजांच्या काळात नाच्याऐवजी तमाशात नाचण्यासाठी स्त्रिया येऊ लागल्या. त्यामुळे तमाशातील अश्लीलता वाढू लागली. विदर्भ-मराठडयात तमाशात स्त्रियांत सहभाग नव्हता व आजही नाही.

**४. मावशी :** फारशी रंगभूषा, वेशभूषा न केलेले मावशीसारखी वाटावी म्हणून डोक्यावर पदर ओढलेले एक वयस्क पात्र म्हणजे मावशी. खडसावून बोलणारी, अश्लील विनोद निर्माण करणारी, तारुण्याच्या खाणाखुणा हेरणारी राधेची सखी.

**५. सोंगाड्या :** विदर्भात तमाशात सोंगाड्याला 'नकल्या' म्हणून ओळखल्या जाते. नकल्या आपल्या मुक्त अभिनयाने तमाशाच्या शेवटपर्यंत प्रेक्षकांना हसवितो. तमाशातील यशस्वीतेत नकल्याचा फार मोलाचा वाटा असतो. हा सोंगाड्या निखळ विनोद निर्माण करण्यापेक्षा शब्दविपर्यास, ग्राम्य-अश्लील शब्दांचा वापर करून विनोद निर्माण करतो. त्याची वेशभूषाही मजेदार असते. अंगात अस्ताव्यस्त शर्ट, गुडघ्यापर्यंत हाफपँट, लांबलचक नाळा, डोक्यावर आडवी टोपी, कमरेला मळकट फाटका दुपट्टा असा त्याचा पेहेराव असतो. हाच सोंगाड्या गौळणीत मावशीची भूमिका करतो. त्यानंतर अन्य कुठल्यातरी भूमिका करतो. सोंगाड्या हा तमाशातील दोन प्रसंगांना जोडणारा दुवा आहे.

**वाद्य वाजवणारी मंडळी** :

वरील पात्रांव्यतिरिक्त तमाशात ढोलकमास्तर, तंतुवादक, चोणकवादक, किलोटमास्टर सनइसारखे वाद्य वाजविणारा ही मंडळी असते. तमाशाच्या अगदी प्रारंभी ही मंडळी रंगमंचावर वाद्यांचा गजर करून धून सादर करतात. त्यामुळे आता तमाशा सुरू होत आहे. याची सर्वांना चाहूल लागते. तमाशातील प्रेक्षकांची गर्दी वाढू लागते आणि तुणतुन्यांच्या लयबद्ध ध्वनीतून तमाशाला रंग चढत जातो. तंतुवादक तसेच सोबत असलेले आणखी एक-दोन सहकारी शाहिराचे गाणे उचलून री ओढण्याचे काम करतात.

**तमाशा सादरीकरणाचे विविध टप्पे** :

रंगमंचावर तमाशा सादर होत असताना तो प्रमुख चार टप्यांतून सादर होतो. पण, गौळण, लावणी, वग ही तमाशातील प्रमुख चार अंगे होत. याशिवाय भेदिक कवण, फार्स, छक्क्ड, फटका ही तमाशातील दुयम अंगे होत.

**गण :** कोणत्याही कार्याला प्रारंभ करताना ईश्वराला वंदन करण्याची प्राचीन परंपरा तमाशा या लाकेनाट्यातही अतिशय उत्तमरित्या जोपासली जोपासली जाते. गण म्हणजे गणपतीला केलेले नमन होय. महाराष्ट्रात 'कलगीवाले' आणि 'तुरेवाले' असे दोन संप्रदाय आहेत. कलगीवाले शक्तिवाचक तर तुरेवाले शिववाचक किंवा ब्रम्हाला मानणारे. दाघेही आपल्याला देवतांचे स्तवन गणात करीत असतात.

उदा. 'मनभावे मी पुजा करतो, करतो आज तुला

धावून ये गणराज गजानन, गौरीच्या मुला, हा गण विदर्भातील तमाशात गायल्या जातो.

**गौळण :** गण संपला की गौळण सुरू होते. गौळणीत निरनिराळी पात्रे मंचावर येतात. कृष्ण, राधा, मावशी, गौळणी, पेंद्या इ. पात्रांच्या अभिनयातून गौळण फुलते. गौळणीत मथुरेच्या बाजाराचा प्रसंग असतो. दही दुधाचे माठ डोक्यावर घेऊन राधा, तिच्या सख्या गौळणी व मावशीबाई बाजाराला निघतात. वाटेत. कृष्ण व त्याचे सवंगडी पेंद्या-सुदामा त्यांचा मार्ग अडवतात. गोरसाचा आस्वाद घेतल्यानंतर कष्ण गौळणीचा मार्ग मोकळा करतो. कधी-कधी दहीदुधाचे माठ फोडण्याचा प्रसंगही गौळणीत येतो. परंतू मथुरेच्या बाजाराचा प्रसंग सर्वांच्या परिचयाचा आहे. राधा-कृष्ण प्रेमाचा प्रसंग, अनुभवी मावशी राधेला उपदेश देतानाचा प्रसंग गौळणीत येतात. नृत्य संगीत-नाटय-अभिनय यांचे दिलखुलास प्रत्यंतर गौळणीतून येते.

**लावणी :** गौळणीनंतर तमाशात लावणी नृत्य आणि संगिताची जुगलबंदी असते. ढोलकीच्या तालावर तमाशातील नाच्याचे पाय थरूथरू लागतात. ढोलकीच्या चढत जाणाऱ्या आवाजाबरोबर अतिशय वेगाने पायांनी हालचाली, चेहऱ्यावरील हावभाव, थरथरते शरीर चित्ताकर्षक असते. त्याच्या पैजनांचा आवाज मनाला भिडून जातो. नाच्या नाचन्यात दंग होऊन जातो. नाच्याच्या यौवनसंपन्न अदा समोरील प्रेक्षकांना मोहवून टाकणाऱ्या असतात. शृंगार हा लावणीचा मुख्य विषय असला, तरी याव्यतिरीक्त आध्यात्मिक लावण्या, अन्य विषयावरील लावण्या इ. लावण्यांचे प्रकार तमाशात पाहायला मिळतात.

**वग :** वग हे तमाशात सादर केले जाणारे महत्वपूर्ण कथनाटय होय, वगावरच तमाशाचे खरे यश अवलबून असते. प्रत्येकच तमाशात वग असतो. वगातील कथानकाची सुरुवात सूत्रधार आणि सोंगाडया करतात. कथानक गद्य-पद्य संवादाच्या रूपात असते. हे कथानक कधी लिखित नसते. यातील गद्यसंवाद पात्रांना उत्स्फूर्तपणे समस्येवर आधारीत असते. अलीकडच्या तमाशात पौराणिक कथांपेक्षा वर्तमानातील ज्वलंत सामाजिक समस्या वगाचा विषय होताना दिसतात. उदा. हुंडाबळी, सासुरवासीन स्त्रीवरील अत्याचार, दारूच्या व्यसनामुळे उद्ध्वस्त संसार, भाऊबंदकी, अनैतिक प्रेमसंबधातून उद्ध्वस्त झालेला संसार, अंधश्रद्धेला बळी पडलेले कुटुंब, स्त्रीशिक्षण कुटुंब नियोजन, डॉ. आंबेडकर, म.फुले यांचे सामाजिक कार्य-चरित्र, राष्ट्रभक्ती इत्यादी सामाजिक विषयांबरोबर राजकिय, धार्मिक, पौराणिक विषयही वगाच्या माध्यमातून तमाशात हाताळले जातात. तमाशाचा सूत्रधार कथानाट्यातील घटना आणि स्थळाबद्दल निवेदनातून आणि गीतारचनेतून प्रेक्षकांना सांगत असतो. तमाशातील पूर्वार्ध तितका सूत्रबद्ध नसतो. केवळ रंजनाच्या दृष्टीने गौळण, लावणी, फार्स, सादर होतात. पण वग सुरू होताच तमाशाला आकार प्राप्त होऊ लागतो. आतापर्यंत आनंद लुटणाार प्रेक्षकवर्ग धीरगंभीर होऊन वगातील कथनकाशी एकरूप हातो. याच वगाचे विकसित रूप म्हणजे नाटक होय असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. म्हणजे महाराष्ट्रातील लोकजीवनाचा जणू दर्पणच आहे.

**भेदिक शाहिरी किंवा कवन :** दोन फडांनी ऐकमेकांना भेदिक वा कूट प्रश्न विचारून सादर केलेली शाहिरी म्हणजे 'भेदिक शाहिरी' होय. महाराष्ट्रातील तमाशात कलगी आणि तुरा असे दोन फड आहेत. भेदिक शाहिरी कलगी-तुरेवाले एकाच मंचावर येऊन कवनातून एकमेकांना सवाल-जबाब करतात. महाराष्ट्रभर असे चुरशीचे सामने होताना दिसतात. विदर्भात याला 'दुय्यम खडा तमाशा' म्हणतात. भेदिक शाहिरीत ज्या काव्यातून सवाल-जबाब होतो त्या काव्याला 'भेदिक' किंवा 'कुटात्मक' लावण्या म्हणतात. तमाशात आध्यात्मिक कूटरचनेत रामायण, सगुण-निर्गुण, द्वैत-अद्वैत इ. विषयांवर प्रश्नोत्तरे होतात. तर लौकिक कूटरचनेत पृथ्वीची उत्पत्ती, तिचा निर्माता, घरबांधणीसंबंधीचा प्रश्न, शेतीविषयक प्रश्न, कौटुंबिक, घरगुती, लौकिक व्यवहार-आचार-विचार इ. संबंधी प्रश्नोत्तरे होतात. शाहिरांनी बौद्धिक आणि वैचारिक भूक भागविण्यासाठी भेदिक शाहिरी निर्माण केली. महाराष्ट्रात अशा तमाशाला प्रचंड गर्दी असायची. बरेचदा व वर्तमान काळात तिकिट ठेवून अशा तमाशाचे प्रयोग होत आहेत.

**फार्स :** महाराष्ट्रात सर्वत्र तमाशामध्ये मिळतो. फार्स म्हणजे तमाशातील हास्यप्रधान आणि विनोदी प्रसंग तमाशात वेळोवेळी अनुभवायला मिळतात. सोंगाड्या-मावशी, पेंद्या-सोंगाड्या यांच्या संवादातून फार्स निर्मान होतो. सोंगाड्या तमाशात थापा मारून लोकभाषेतून भरपूर विनोद निर्मान करतो व प्रेक्षकांना हसवितो. तमाशात विनोद निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात लोकजीवनाचे अतिरेकी विडंबन अश्लील शब्दांचा अतिरेकी वापर दिसून येतो.

**समारोप/उपसंहार :**

महाराष्ट्रातील तमाशा लोकनाट्यात सर्वच घटक आढळून येतात. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांतील माणसांचे आजही तमाशाशी अतुट नाते आहे. विदर्भात तर आजही गावोगावी रात्रभर 'खडी गंमत'चे प्रयोग चालतात. तमाशाचा श्रोतावर्ग असलेला मराठी माणूस हा खेडयापाडयात राहणारा गरीब, शेतकरी, शेतमजूर वर्ग. या वर्गाचे आपल्या शेतीची लोकसंस्कृतीशी, परिसराशी, निसर्गाशी अतूट नाते आहे. कष्टाचा ताण नाहीसा व्हावा व मनाला विरंगुळा मिळावा म्हणून हा मराठी माणूस तमाशातून आपले मनोरंजन करून घेतो. श्रमपरिहार व मनोरंजनासाठी तमाशाची निर्मिती झाली आहे. आजही महाराष्ट्रात यात्रा-जत्रा, पोळा, दसरा-दिवाळी, संक्रांत, बैलांचा शंकरपट, कुस्त्यांची आमदंगल, सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्र, शारदादेवी, राष्ट्रीय सण-उत्सव, लग्न बारशे आदि प्रसंगाचा निमित्याने तमाशाचे प्रयोग होताना दिसतात. आजही महाराष्ट्रात शाहिरांना तमाशाचे शिक्षण देणाऱ्या शाळा ज्याला आपण 'फड' म्हणतो, हे फड अस्त्वित आहेत. पूर्वीच्या पट्ठे बापूराव, सातप्पाच्या फडाप्रमाणे विदर्भात कन्या, गरिब्या, सदाशिव, लक्ष्मण, मोरेश्वर, परसराम, बुधा आदी शाहीरांचे 'फड' पाहायला मिळतात. कलगी-तुऱ्याच्या गमतीला तर विदर्भात मोठी गर्दी जमते. तमाशाने मराठी लोकजीवनाची मराठी लोकभाषेतून नक्कल करून मराठी माणसाचे भरपूर मनोरंजन केले. अलीकडे तमाशाचे पारंपारिक रूप बदलत चालले असुन त्यावर हिंदी सिनेमांचा फार मोठा परिणाम झाला आहे. हल्लीचे शाहीर हिंदी सिनेमांचा तर्जवर गाणे रचून जातात. हा बदलही प्रेक्षकांनी स्विकारुन तमाशाला आपलेसे केले यात शंका नाही.

**निष्कर्ष :**

तमाशा म्हटला की आजही मराठी माणसामध्ये नवा जोश, नवे चैतन्य निर्माण होते. ग्रामिण जीवनाशी नाते तुटलेल्या

शहरी माणसाला देखील तमाशा आपल्याकडे खेचून घेतो. तमाशा लोकनाट्याने मराठी माणसाचे निखळ मनोरंजन तर केलेच, पण समाजप्रबोधनाचे कार्यही तितक्याच पोटतिडकिने केले. पत्रकाराने जसे वृत्तपत्रातून समाजजागृतीचे कार्य करावे तसे शाहिराने वगातून अनेक सामाजिक विषय हाताळून समाजजागृतीचे कार्य केले. समाजप्रबोधनासाठी महाराष्ट्रात जे जलसे निर्माण झाले, ते परंपरेने चालत आलेल्या तमाशाचे उद्‌बोधनपर रूप आहे. सत्यशोधकी व आंबेडकरी जलशांनी महाराष्ट्रात जे समाजप्रबोधनाचे  कार्य केले, ते तमाशाच्या प्रेरणेतूनच. तमाशाने मराठी नाटकाला जन्म दिला. मराठी चित्रपटांना प्रेरणा दिली. दादा कोंडके यांचे बहुतांश चित्रपट म्हणजे तमाशाचे विकसित तंत्रबद्ध रूप वाटायला लागते. अशा प्रकारे तमाशाने जलसे, नाटक, चित्रपट जन्माला घातले. आज मात्र महाराष्ट्राचे चित्र झपट्याने बदलत आहे. लळित, दंडार, भजन, किर्तन, भारुडे आदी लोकनाट्याप्रमाने तमाशा ह्या लोकनाट्यालाही उतरती कळा लागली आहे. शहरीकरण, जागतीकीकरण, पाश्चात्य संस्कृतीचा स्वीकार त्यामुळे लोकांच्या आवडीनिवडी, आचारविचार बदलत चालले आहेत. हल्ली सण-उत्सव प्रसंगी तमाशाऐवजी नाटक, चित्रपट, रेकॉर्डिंग डॉन्स, संगीत ऑकेस्ट्रा पाहायला मिळतो. शहरापासुन गावापर्यंत तरुण पिढीला तर ढोलकी आणि तुणतुण्याच्या आवाजात रस वाटत नाही. मनोरंजीची गरज भागविणसऱ्या नानाविध दूरदर्शन वाहिन्या आज गावापर्यंत पोहोचल्या. माहीती तंत्रज्ञान, जागतिकीकरण, शहरीकरण यामुळे शहरी-ग्रामीण अंतर कमी होऊन ग्रामीण जीवनशैली झपाटयाने बदलत आहे.

हा सगळा बदल पाहता महाराष्ट्रातील ग्रामीण जीववनातून जसे गारुडी, गोपाळ, वासुदेव, जोशी, भाट, मदारी, नंदीवाला, बहुरूपी, पांगुळ इ. लोककलावंत हद्दपार झाले, तसे 'तमाशा' या लोकनाटयाच्या बाबतीत तर होणार नाही ना, अशी शंका वाटायला लागते. असे जरी असले तरी महाराष्ट्राची शान असणारा तमाशा व या हौशी रंगभूमीवरील रसिक आहेत तोपर्यंत तमाशा अजरामर आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**


१. ्डॉ. पुरुषोत्तम कालाभूत, लोकनाटय : उद्‌गम आणि विकास प्रकाशन, नागपूर, प्र.आ., १९९९.
२. नागदेव व्हटकर, मराठीचे लोकनाटय, तमाशा कला आणि साहित्य.
३. डॉ. संपकाळ, डॉ. मोरजे, बखर व शाहिरी वाड्.मय, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक, प्रकाशन, १९९२.
४. तत्रैव
५. डॉ. तारा भवाळकर, मराठी नाट्यापरंपरा : शोध आणि आस्वाद- पुणे. १९९५
६. संदेश भंडारे, तमाशा एक रांगडी गंमत, लोकवाङ्मय गृह मुंबई. २००६


☆☆☆